| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा ६/२०१८**<br>**श्री. दत्तात्रय रामचंद्र शेटे**<br>**वि.**<br>**श्री. भगवान तुकाराम शेटे** |

# नि. ५० वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम २ प्रमाणे प्राथमिक मुद्दा काढणेकरिता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी नि. ५१ येथे त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच वादी याने प्रतिवादी विरुद्ध दावा मिळकतीचे खरेदीपत्र होवून मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने वादीने असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे, तसेच प्रतिवादीला ती मिळकत तबदील करण्याचा मालकी हक्क व अधिकार आहे. तसेच त्याबाबतचे संस्कारपत्र वादीने दि. १०.०७.२०१७ रोजी झाल्याचे दाव्यात नमूद केलेले आहे. मात्र वादीने दाव्यामध्ये नमूद केलेले मिळकतीचे वर्णन बरोबर आहे का तसेच सदरची संपूर्ण मिळकत प्रतिवादीचे मालकी वहिवाटीची आहे का व ती मिळकत एकटया प्रतिवादीस तबदील करण्याचा हक्क आहे का तसेच सदरच्या मिळकतीचे संस्कारपत्र व खरेदीपत्र करता येते का याबाबत प्राथमिक मुद्दे काढणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदर मुद्दयांबाबत प्राथमिक मुद्दा काढणे गरजेचे आहे. अंतिमतः प्रतिवादी तर्फे वकील यांनी सदर अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच प्रतिवादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो वादीस मान्य व कबूल नाही. मुळातच प्रतिवादी कथन

करतात त्याप्रमाणे वस्तुस्थिती नाही. प्रतिवादीने वादीची फसवणूक केलेली आहे. वादीने करारपत्र नमूद खरेदीपत्र पुर्ण करून देण्याची अथवा संचकारादाखल प्रतिवादीने स्वीकारलेली रक्कम मागणी केलेली आहे. मुळातच प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे कोणताही प्राथमिक मुद्दा काढण्याची गरज नाही. तसेच वादीने दाव्यात नमूद केलेल्या मिळकतीबाबत व प्रतिवादींच्या हक्कांबाबत प्रतिवादी मुद्दामहून वाद उपस्थित करून त्याबाबत क्लिष्टता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम २ मधील तरतुदींच्या विरुद्ध आहे. मुळातच प्रतिवादीने वादी यास दावा मिळकत विक्री करण्याचे निश्चित करून संचकारादाखल रक्कम स्वीकारून संचकारपत्र करून दिलेले आहे. मात्र सदर दाव्यात प्रतिवादी केवळ सुनावणी लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे सदर बाबत प्राथमिक मुद्दा काढण्याची कोणतीही गरज अथवा आवश्यकता नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. प्रतिवादी यांचा अर्ज वादी यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम २ मधील तरतुद पुढीलप्रमाणे :-
न्यायालयाने सर्व वादमुद्यांवर न्यायनिर्णय अधिघोषित करणे.

> *"(१) एखाद्या प्रारंभिक वादमुद्याच्या आधारे प्रकरण निकालात काढता येण्यासारखे असले. तरी, न्यायालयाने पोटनियम (२) मधील तरतुदींच्या अधीनतेने, सर्व वादमुद्यांवर न्यायनिर्णय अधिघोषित केला पाहिजे.*
>
> *(२) एकाच दाव्यामध्ये तथ्यविषयक किंवा कायदेविषयक असे दोन्ही प्रकारचे वादमुद्दे उपस्थित झाल्यास आणि त्या प्रकरणाचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा केवळ कायदेविषयक वादमुद्यावरच निकाल करता येईल*

*असे न्यायालयाचे मत झाल्यास, जर तो वादमुद्दा*

*(अ) न्यायालयाच्या अधिकारितेशी, किंवा*

*(ब) त्या त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे दाव्यास झालेल्या रोधाशी, संबंधित असेल तर, न्यायालयास प्रथम त्या वादमुद्याची संपरीक्षा करता येईल आणि त्या प्रयोजनार्थ, स्वतःला योग्य वाटल्यास ते न्यायालय त्या वादमुद्याचा निर्णय होईपर्यंत अन्य वादमुद्याचा निर्णय लांबणीवर टाकू शकेल, आणि त्या वादमुद्यावरील निर्णयाच्या अनुरोधाने दाव्याचा परामर्श घेईल".*

७. मुळातच वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार वादी यांचा दावा हा खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेसाठी तसेच तसे खरेदीपत्र पुर्ण न केल्यास दिलेली रक्कम परत मिळणेकरिता तसेच कायम मनाईकरिता दाखल करण्यात आलेला आहे. मुळातच वादीच्या कथनानुसार सदर संस्कारपत्र हे वादी व प्रतिवादी यांचे मध्ये झालेले होते. मात्र सदर मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे किंवा कसे तसेच प्रतिवादी यास ती तबदील करण्याचा हक्क व अधिकार आहे का याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम २ मधील तरतुदींचे अवलोकन करणे गरजेचे ठरते.

८. मुळातच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम २ प्रमाणे प्राथमिक मुद्दा हा न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित असेल किंवा कोणत्याही कायद्याद्वारे दाव्यास झालेल्या रोधाशी, संबंधित असेल तर अशावेळी प्राथमिक मुद्दा दाव्यात काढून त्याचा निर्णय घेता येतो.

९. मुळातच प्रतिवादीच्या अर्जाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता, त्यामध्ये प्रतिवादी सदर मिळकत ही प्रतिवादीची आहे किंवा कसे तसेच सदरच्या मिळकतीचे

संस्कारपत्र व खरेदीपत्र प्रतिवादी यास करता येते का असा अर्ज दिसून येत आहे.

१०. पण मुळातच सदर अर्जाचे अवलोकन करता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम २ नुसार प्राथमिक मुद्दा निर्माण होत नाही असे वाटते. त्यामुळे प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

**प्रतिवादी यांचा नि. ५० वरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.**

सही/-

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि. ०५.११.२०२५